# 1 जानेवारी

## आजचा सुविचार :

“जगात प्रत्येकाकडे 24 तास असतात, ज्यांना यशस्वी व्हायचे असेल ते त्याचा योग्य प्रकारे वापर करण्यास शिकतात.”

## आजचे पंचांग :

वार – शनिवार

दिनांक : 1 जानेवारी 2022

तिथी – मार्गशीर्ष

नक्षत्र – ज्येष्ठा

सुर्योदय – सकाळी 6.59 वाजता

सूर्यास्त – सायंकाळी 6. 12 वाजता

## आजचे दिनविशेष :

वर्षातील पहिला दिवस

1848: महात्मा जोतीबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी भिडे वाडा पुणे येथे पहिली मुलींची शाळा सुरु केली.

1862: इंडियन पिनल कोड अस्तीत्वात आले.

1923: चित्तरंजन दास आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्वराज्य पार्टीची स्थापना केली.

1932: डॉ. नारायण परुळेकर यांनी सकाळ वृत्तपत्र सुरु केले.

## आजचे इंग्लिश शब्द :

1) Chance – संधी 2) Cheek - गाल 3) Child – मूल 4) Circle – वर्तुळ

## आजची प्रश्नमंजुषा :

1) सूर्य कोणत्या दिशेला उगवतो?

2) पृथ्वीवरील सर्वात उंच प्राणी कोणता?

3) पृथ्वीच्या वातावरणात कोणता वायू सर्वात जास्त प्रमाणात आहे?

4) विजेच्या दिव्यात कोणत्या धातूची तार वापरतात?

## बोधकथा :

### सुयांचे झाड

एकदा दोन भाऊ जंगल किनारी राहत होते.मोठा भाऊ त्याच्या लहान भावासोबत खूप स्वार्थी वृत्तीने वागत असे.लहान भावाचे सगळे जेवण खाऊन टाकत असे आणि त्याच्या सगळ्या चांगल्या वस्तू कपडे घेत असे. एकदा मोठा भाऊ जंगलात लाकूड गोळा करण्यासाठी गेला.एकामागून एक अशा झाडांच्या फांद्या तोडत असताना तो एका जादुई झाडाजवळ पोहोचला. झाड त्याला म्हणाले, “महोदय,कृपा करून माझ्या फांद्या तोडू नका,जर तुम्ही मला सोडून दिले तर मी तुम्हाला सोन्याची सफरचंदे देईन.” मोठा भाऊ तयार झाला, पण सफरचंदाची संख्या पाहून निराश झाला.लोभाने त्याचा ताबा घेतला आणि त्याने झाडाला धमकी दिली कि, “जर मला जास्त सफरचंद मिळाली नाहीत तर खोड कापून टाकीन.” झाडाने सफरचंदे तर दिली नाहीतच पण त्याच्यावर शेकडो सुयांचा वर्षाव केला. मोठा भाऊ वेदनेने विव्हळत होता.सूर्य अस्तास निघाला होता.लहान भावाला काळजी वाटली, तो मोठ्या भावाच्या शोधात निघाला.शेकडो सुया घुसलेल्या अवस्थेत तो सापडला.लहान भाऊ त्याच्या मोठ्या भावाकडे धावत गेला, आणि दु:खदअंतकरणाने त्याने प्रत्येक सुई काढली.सुया काढून झाल्यावर मोठ्या भावाने वाईट वर्तणुकीबद्दल त्याची माफी मागितली. आणि इथून पुढे चांगला वागेन असे वाचनही दिले.झाडणे मोठ्या भावात झालेला बदल पाहून त्यांना भरपूर सोनेरी सफरचंदे दिली.

**तात्पर्य** – दयाळू आणि कृपाळू असणे महत्वाचे आहे करण ते नेहमीच बक्षीसपात्र ठरते.